# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र. मऔविम/भुविभाग/म.व्य.(भुमी)/ B 32584 दिनांक : 03 APR 2017

**परिपत्रक**

**विषय: सूक्ष्म, लघु उपक्रम-औद्योगिक समूह (MSE-CDP) यांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात भूखंड वाटपात प्राधान्य देणेबाबत..**

**वाचावे:** १. महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय क्र. आयआयआय-पॉलिसी २०१०/ प्र.क्र.७६८/ उद्योग-२, दिनांक २२.०२.२०१३

२. परिपत्रक क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/ए११८२७, दि. १०.०१.२०१४

३. परिपत्रक क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/३३२२/२०१२, दिनांक १९.१२.२०१२

३. परिपत्रक क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/२५९६६, दिनांक २२.०१.२०१३

महाराष्ट्र शासनाकडील शासन निर्णय क्र.:एसएमई-२०१३/प्र.क्र. २०७/उद्योग-७, दि. २५.०२.२०१४ अन्वये राज्यातील औद्योगिक धोरणातील तरतुदीनुसार राज्यातील औद्योगिकदृष्टया अविकसित क्षेत्रातील छोटया समूहांचा समूह विकास होण्याच्या दृष्टीकोनातून "महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (MSICDP)" जाहिर करण्यात आली आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्याच्या औद्योगिक विकासामध्ये प्रमुख सहभाग असलेले सूक्ष्म व लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने तसेच त्यांचा उत्पादनाचा दर्जा वाढवून त्यांना अधिक स्पर्धात्मक बनविण्यासाठी अशा औद्योगिक विकास समूहांना प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याने, केंद्र शासनाची सूक्ष्म-लघु उपक्रम औद्योगिक समूह विकास योजना (MSECDP) व आय.आय.यु.एस. (I.I.U.S.) आणि राज्य शासनाची महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (MSICDP) अंतर्गत औद्योगिक समूहाना देखील भूखंड वाटपामध्ये प्राधान्य देण्याचा प्रस्ताव मा. संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदरहू विषयावर संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये चर्चा होऊन त्या संदर्भातील ठराव क्र. ५६३३ पारित करण्यात आला. त्या ठरावाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे धोरण निर्गमित करण्यात येत आहे-

१. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये केंद्र शासनाची सूक्ष्म-लघु उपक्रम औद्योगिक समूह विकास योजना (MSECDP) व आय.आय.यु.एस. (I.I.U.S.) आणि राज्य शासनाची महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना (MSICDP) अंतर्गत औद्योगिक समूहाकरिता प्राधान्याने भूखंड वाटप करावे.

२. प्राधान्याने भूखंड वाटपाबाबत निर्गमित करण्यात आलेल्या महामंडळाच्या दि. १९.१२.२०१२ आणि दि. १०.०१.२०१४ च्या परिपत्रकानुसार निर्गमित केलेल्या धोरणामध्ये औद्योगिक विकास समूह यांचा समावेश करण्यात येत आहे.

३. अशा प्रकारे वाटप होणा-या भूखंडांच्या विकासाकरीता दि. २२.०१.२०१३ च्या परिपत्रकामधील धोरण/तरतुदी लागू करण्यात येत आहे.

महामंडळाच्या दि. २६.०९.२०१६ चे परिपत्रकानुसार, सोयी-सुविधा तसेच, सवलतीच्या दराने भूखंड वाटप करण्याचे अधिकार सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समितीला असल्याने असे प्रस्ताव तात्काळ भूखंड वाटप समितीसमोर सादर करण्यात यावेत.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सह मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई